मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# चिखली स्मशानभूमीत अंधार; गाड्यांच्या दिव्यांत अंत्यसंस्कार!

## वीज गेली, कर्मचारीही गायब; महापालिकेच्या भोंगळ कारभारावर नागरिक संतप्त!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कारभारातील निष्काळजीपणा आणि असंवेदनशीलता टाळगाव चिखली येथील स्मशानभूमीत समोर आल्याचा आरोप होत आहे. स्मशानभूमीतील वीजपुरवठा अचानक खंडित झाल्याने परिसरात अंधार पसरला. अशा परिस्थितीत अंत्यसंस्कारासाठी आलेल्या नातेवाईकांना आणि नागरिकांना चारचाकी वाहनांच्या हेडलाइट्सच्या उजेडात अंत्यविधी पूर्ण करावे लागले. मृत व्यक्तीला अखेरचा निरोप देण्याच्या दुःखद प्रसंगी नागरिकांना अशा गैरसोयीचा सामना करावा लागल्याने महापालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.**



टाळगाव चिखली येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी नागरिक आले असताना अचानक वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे संपूर्ण परिसरात अंधार पसरला. अंत्यविधीसाठी आवश्यक असलेली प्रकाशव्यवस्था उपलब्ध नसल्याने उपस्थित नागरिकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली. अखेर अंत्यसंस्कारासाठी आलेल्या नागरिकांनी आपली चारचाकी वाहने स्मशानभूमी परिसरात लावून त्यांच्या हेडलाइट्सचा उजेड केला. या उजेडात अंत्यविधी पूर्ण करण्याची वेळ नातेवाईकांवर आली.

स्मशानभूमीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी प्रकाशव्यवस्था असणे आवश्यक आहे. मात्र, टाळगाव चिखली स्मशानभूमीत जनरेटर, इन्व्हर्टर किंवा इतर पर्यायी दिव्यांची व्यवस्था नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तातडीने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची असताना नागरिकांनाच वाहनांचे दिवे लावून अंत्यविधी पार पाडावे लागल्याने महापालिकेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, या प्रसंगी स्मशानभूमीत महापालिकेचा सुरक्षारक्षक किंवा जबाबदार कर्मचारी उपस्थित नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी कर्मचारी नेमलेले असताना ते कर्तव्यावर होते की नाही, तसेच वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर परिस्थिती हाताळण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

मृत व्यक्तीला अखेरचा निरोप देणे हा कुटुंबीयांसाठी अत्यंत भावनिक आणि दुःखाचा क्षण असतो. अशा वेळी अंत्यविधी शांततेत आणि सन्मानपूर्वक पार पडणे अपेक्षित असते. मात्र, स्मशानभूमीत अंधार पसरल्याने नातेवाईकांना वाहनांच्या हेडलाइट्सवर अवलंबून राहावे लागले. या प्रकारामुळे उपस्थित नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. महापालिका नागरिकांकडून विविध करांच्या माध्यमातून महसूल गोळा करते. मात्र, नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित सुविधांची देखभाल व्यवस्थित होत नसेल, तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. स्मशानभूमीसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी वीजपुरवठा, प्रकाशव्यवस्था आणि कर्मचारी उपलब्धता याबाबत आवश्यक दक्षता का घेतली जात नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

> “टाळगाव चिखली स्मशानभूमीत घडलेला हा प्रकार अत्यंत संतापजनक, लाजीरवाणा आणि प्रशासकीय असंवेदनशीलतेचा कळस आहे. मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्काराच्या वेळी नातेवाईकांना अशा प्रकारे वाहनांच्या उजेडात विधी करावे लागणे ही महापालिकेसाठी शरमेची बाब आहे. स्मशानभूमीत सुरक्षारक्षक किंवा जबाबदार कर्मचारी कर्तव्यावर का नव्हते, याचा जाब प्रशासनाला द्यावाच लागेल.”
>
> -संगीता ताम्हाणे,
> **नगरसेविका**

# पिंपरीत महाविद्यालयाबाहेर विद्यार्थ्याला बेदम मारहाण!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरीगाव येथील महात्मा फुले महाविद्यालयाबाहेर झालेल्या वादातून एका विद्यार्थ्याला मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पिंपरी पोलिस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाणीत विद्यार्थ्याचा मित्रही जखमी झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच, रॉडने मोबाइलवर मारून त्याचे नुकसान केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.**



या प्रकरणी गौरव उमेश गुप्ता (वय २०, रा. सुदर्शन चौक, पवना मित्र मंडळ, पिंपरीगाव) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी साहिल मनोहर, लकी जावळे, राकेश मोघेड, सागर गायकवाड (सर्व रा. भोसरी) आणि निशांत अहिरे (रा. पिंपरी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास गौरव गुप्ता हे महात्मा फुले महाविद्यालयात टीव्ही वाय-फाय कॉमर्सचा पेपर देण्यासाठी गेले होते. त्यांचा मित्र साकिब अत्तार हा देखील गाडीवरून पेपर देण्यासाठी महाविद्यालयात आला होता.

पेपर संपल्यानंतर महाविद्यालयाबाहेर गाडी लावत असताना साहिल मनोहर याने गौरव यांना हाताने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. त्यानंतर लकी जावळे याने गौरव यांना उद्देशून, “तुला फार मस्ती आली आहे का?” असे म्हणत शिवीगाळ केली. यानंतर इतर आरोपींनीही गौरव यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

गौरव यांना वाचवण्यासाठी त्यांचा मित्र साकिब अत्तार मध्ये आला असता, त्यालाही मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. यावेळी रॉडने गौरव यांच्या मोबाइलवर मारून त्याचे नुकसान करण्यात आले. महाविद्यालयाबाहेर घडलेल्या या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

या घटनेप्रकरणी पिंपरी पोलिस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# पिंगळे रोडचे डांबरीकरण सुरु!

## खड्ड्यांच्या त्रासातून लवकरच सुटका; यश साने यांच्या पाठपुराव्याला यश

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंगळे रोडवरील खड्ड्यांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांसाठी दिलासादायक बातमी आहे. या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली असून, त्यामुळे लवकरच वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांचा प्रवास अधिक सुखकर व सुरक्षित होण्याची अपेक्षा आहे. गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांना ये-जा करताना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. तसेच, खड्ड्यांमुळे अपघात होण्याचा धोकाही वाढला होता.**







पिंगळे रोडची दुरवस्था झाल्याने वाहनचालकांना खड्डे चुकवत प्रवास करावा लागत होता. यामुळे वाहतुकीचा वेग मंदावण्याबरोबरच नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. या समस्येची दखल घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर प्रशासनाकडून सुरुवातीला रस्त्याचे बीबीएम (BBM) काम पूर्ण करण्यात आले. आता पुढील टप्प्यात डांबरीकरणाला सुरुवात झाली असून, आधुनिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने रस्ता गुळगुळीत करण्याचे काम सुरू आहे. पिंगळे रोडच्या डांबरीकरणामुळे रस्त्यावरील खड्ड्यांची समस्या दूर होण्यास मदत होणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांना अधिक सुरळीतपणे प्रवास करता येईल. तसेच, खड्ड्यांमुळे होणारी वाहनांची कसरत आणि अपघातांचा धोका कमी होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे या मार्गावरून नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र, काम दर्जेदार पद्धतीने आणि निर्धारित वेळेत पूर्ण व्हावे, अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

पिंगळे रोडवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. याबाबत नगरसेवक यश साने म्हणाले, “पिंगळे रोडवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. आता रस्त्याचे काम मार्गी लागले असून, डांबरीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आहे. नागरिकांना चांगला आणि सुरक्षित रस्ता उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे.”

प्रभागातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती आणि डांबरीकरणाची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे स्थापत्य विभागाकडून सांगण्यात आले. पिंगळे रोडचे काम लवकरच पूर्ण होईल, अशी माहिती स्थापत्य ‘फ’ प्रभागाचे अभियंता शिवाजी चौरे यांनी दिली.

> पिंगळे रोडवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन आम्ही सातत्याने पाठपुरावा केला होता. हे काम मार्गी लागले असून डांबरीकरणाद्वारे हा रस्ता तातडीने पूर्ण व्हावा अशी अपेक्षा आहे , जेणेकरून नागरिकांना एक चांगला आणि सुरक्षित रस्ता उपलब्ध होईल.”
>
> – यश साने, नगरसेवक

> "प्रभागातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती व डांबरीकरणाची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध असून पिंगळे रस्त्याचे काम लवकरच पूर्ण होईल."
>
> –शिवाजी चौरे, अभियंता, स्थापत्य फ' प्रभाग

दरम्यान, पिंगळे रोडच्या डांबरीकरणाला सुरुवात झाल्याने नागरिकांच्या प्रवासातील अडचणी दूर होण्याची आशा निर्माण झाली आहे. आता हे काम दर्जेदार पद्धतीने आणि वेळेत पूर्ण करून नागरिकांना सुरक्षित रस्ता उपलब्ध करून देण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे.

# फेक इन्स्टाग्राम आयडीवरून ब्लॅकमेलिंग; आरोपीला अटक!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**इन्स्टाग्रामवर बनावट अकाउंट तयार करून खासगी फोटोच्या आधारे तरुणाला ब्लॅकमेल करत ५० हजार रुपयांची खंडणी मागणाऱ्या आणि त्याच्या मैत्रिणीकडे शारीरिक संबंधांची मागणी करणाऱ्या आरोपीला पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली आहे. हनुमान सुभाष खरात (वय ३५, मूळ रा. वरुडी, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून मोटारसायकल, मोबाईल, पाकीट, आधारकार्ड आणि इतर साहित्य असा एकूण एक लाख चार हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने ‘RUCHITA NIKARN93’ या नावाने इन्स्टाग्रामवर बनावट अकाउंट तयार केले होते. या अकाउंटवरून फिर्यादी तरुणाशी संपर्क साधून त्याला एका मुलीच्या खासगी अवयवांचा फोटो पाठवण्यात आला. त्यानंतर तरुणाला स्वतःचा खासगी फोटो पाठवण्यास सांगण्यात आले. तरुणाने फोटो पाठवल्यानंतर आरोपीने त्यांच्यातील संभाषण एका अनोळखी मोबाईल क्रमांकाच्या व्हॉट्सॲपवर पाठवले.

त्यानंतर आरोपीने तरुणाला त्याचे खासगी फोटो कामाच्या ठिकाणी असलेल्या कार्यालयीन मोबाईलवर तसेच तो पार्टटाइम नोकरी करत असलेल्या ठिकाणी पाठवण्याची धमकी दिली. फोटो प्रसारित करायचे नसतील, तर ५० हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी करण्यात आली. पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मैत्रिणीकडेही शारीरिक संबंधांची मागणी आरोपीने तरुणाच्या मैत्रिणीच्या व्हॉट्सॲपवर संदेश पाठवून, गणेशला त्रास होऊ द्यायचा नसेल तर माझ्यासोबत शारीरिक संबंध ठेव किंवा पैसे पाठव, अशी मागणी केली. तसे न केल्यास वायसीएम रुग्णालयात आपले अनेक मित्र असून ते गणेशला मारहाण करतील, अशी धमकीही दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

याशिवाय, ‘BHALCHANDRA AHER’ या नावाच्या फेसबुक अकाउंटवरूनही फिर्यादीला संदेश पाठवून धमकावण्यात आले. रुचिता नावाची मुलगी आणि तिचा मित्र ऐकत नसून ते सायबर पोलिसांकडे तक्रार करणार असल्याचे सांगून आरोपीने दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तांत्रिक तपासातून आरोपीचा शोध गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने संबंधित मोबाईल क्रमांकाचा तांत्रिक तपास सुरू केला. या तपासातून हनुमान सुभाष खरात याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्यात आले.

# चॅलेंजर स्कूलच्या विद्यार्थ्यांची 80 मिनिटांची स्केटिंग मॅरेथॉन!

## जिद्द, चिकाटी आणि क्रीडाभावनेचे दर्शन; जागतिक विक्रम नोंदविण्याचा प्रयत्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

**भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित ८० मिनिटांच्या नॉन-स्टॉप स्केटिंग मॅरेथॉनमध्ये चॅलेंजर पब्लिक स्कूलच्या आठ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी केली. सलग ८० मिनिटे स्केटिंग करण्याचे आव्हान स्वीकारत विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, शिस्त आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडवले.**




१५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सायंकाळी ५ ते ६.२० या वेळेत ८० मिनिटांच्या नॉन-स्टॉप स्केटिंग मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश FORBES BOOK OF WORLD RECORDS, UNITED ARAB EMIRATES WORLD BOOK OF WORLD RECORDS आणि EUROPEAN UNION BOOK OF WORLD RECORDS या तीन जागतिक विक्रम नोंदविणाऱ्या संस्थांमध्ये विक्रम नोंदविण्याचा प्रयत्न करणे हा होता. या मॅरेथॉनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करणे, त्यांची शारीरिक क्षमता वाढविणे आणि सातत्यपूर्ण सरावाचे महत्त्व अधोरेखित करणे, हाही उद्देश होता.

या मॅरेथॉनमध्ये चॅलेंजर पब्लिक स्कूलचे हर्ष बजाज, शनय चेतन धाकटे, समन्यू नरेंद्र अंबाडे, विराज काळूराम इंगवले, अद्वैत बाबासाहेब कोकिटकर, तरुण हरेश माणिक, शिवम संजय बोंबले आणि मोरया चौधरी या आठ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सलग ८० मिनिटे स्केटिंग करण्याचे आव्हान स्वीकारताना विद्यार्थ्यांनी आपली शारीरिक क्षमता, एकाग्रता, सहनशक्ती आणि आत्मविश्वास यांचे दर्शन घडवले. अशा आव्हानात्मक उपक्रमात सहभागी होण्यासाठी शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक तयारी, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेत क्रीडाभावनेचे महत्त्व अधोरेखित केले.

आजच्या काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातील सहभागही महत्त्वाचा मानला जातो. स्केटिंगसारख्या खेळांमुळे शरीराचा समतोल राखणे, एकाग्रता वाढविणे, सहनशक्ती विकसित करणे आणि स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे यांसारखे गुण विकसित होण्यास मदत होते. तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना नवीन आव्हाने स्वीकारण्याची आणि अडचणींवर मात करण्याची प्रेरणा मिळते. चॅलेंजर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी या मॅरेथॉनमध्ये सहभाग घेत इतर विद्यार्थ्यांसमोरही एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले.

विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त सहभागाची आणि क्रीडा क्षेत्रातील जिद्दीची दखल घेत चॅलेंजर पब्लिक स्कूलचे चेअरमन संदीप काटे आणि प्राचार्या ज्योतिका मलकानी यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे विविध क्रीडा उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपल्या कौशल्याचा विकास करावा आणि शाळेचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. विद्यार्थ्यांच्या या सहभागामुळे शाळेतील क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन मिळण्यासोबतच इतर विद्यार्थ्यांनाही खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या दिशेने प्रेरणा मिळणार आहे.

### ८० मिनिटे स्केटिंगचे आव्हान!

स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित नॉन-स्टॉप स्केटिंग मॅरेथॉनमध्ये चॅलेंजर पब्लिक स्कूलच्या आठ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सलग ८० मिनिटे स्केटिंग करण्याच्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, एकाग्रता आणि क्रीडाभावनेचे दर्शन घडवले. जागतिक विक्रम नोंदविण्याच्या प्रयत्नासाठी आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन मिळाले.

# जीएसटीच्या नावाखाली व्यापाऱ्याला ३४.९६ लाखांचा गंडा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**दुकानातील वस्तूंच्या विक्रीतून जमा झालेली जीएसटीची रक्कम शासनाकडे जमा न करता व्यापाऱ्याची ३४ लाख ९६ हजार रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




तक्रारीनुसार, जब्बार शयफुद्दीन पटेल (वय ३२, रा. थेरगाव) आणि मकरंद अनिल घेवारी (वय ४०, रा. भोसरी) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुकानाच्या व्यवसायाशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि जीएसटी भरण्याच्या प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२० पासून नोव्हेंबर २०२३ पर्यंत आंबेडकर चौकातील डी.सी. चेंबरमधील दुकान क्रमांक १ आणि २ येथे 'न्यू अशोक मोटर पार्ट्स' या नावाने व्यवसाय सुरू होता. या व्यवसायाच्या आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन, अकाउंटिंग तसेच जीएसटीची रक्कम शासनाकडे जमा करण्याची जबाबदारी आरोपी जब्बार पटेल याच्याकडे सोपविण्यात आली होती. त्यामुळे व्यवसायाशी संबंधित जीएसटीचे व्यवहार योग्य पद्धतीने पूर्ण होतील, अशी अपेक्षा फिर्यादीची होती.

मात्र, या कालावधीत जीएसटीच्या रकमेबाबत गैरव्यवहार झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. आरोपी जब्बार पटेल याने स्वतःच्या 'सेव्हन स्टार इंडस्ट्रियल सप्लायर्स' या फर्मची तसेच मकरंद घेवारी यांच्या 'मातोश्री इंजिनिअरिंग वर्क्स' या फर्मची जीएसटीची रक्कम शासनाकडे जमा केली नसल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. संबंधित कराची रक्कम शासनाकडे भरण्याऐवजी ती स्वतःकडे ठेवण्यात आल्याचा आरोप असून, या व्यवहारांमुळे फिर्यादीचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, 'मातोश्री इंजिनिअरिंग वर्क्स' या फर्मशी संबंधित जीएसटीची ९ लाख २७ हजार १६२ रुपयांची रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली नसल्याचा आरोप आहे. तर 'सेव्हन स्टार इंडस्ट्रियल सप्लायर्स' या फर्मशी संबंधित २५ लाख ६९ हजार ७९४ रुपयांच्या जीएसटीच्या रकमेबाबतही अनियमितता झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या दोन्ही रकमा एकत्रित केल्यास एकूण ३४ लाख ९६ हजार ९५६ रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. जीएसटीसारख्या महत्त्वाच्या करप्रणालीशी संबंधित व्यवहारांमध्ये अशा प्रकारची अनियमितता झाल्याने व्यापाऱ्याचे आर्थिक नुकसान झाल्याचे या प्रकरणातून समोर आले आहे.

या प्रकरणी २१ ऑक्टोबर २०२६ रोजी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीतील आरोपांच्या अनुषंगाने पोलीस पुढील तपास करीत आहेत. सहायक पोलीस निरीक्षक पांडे या प्रकरणाचा तपास करीत असून, जीएसटीच्या रकमेबाबत नेमके काय घडले, संबंधित आर्थिक व्यवहार कशा पद्धतीने झाले आणि त्यामध्ये कोणाची भूमिका होती, याचा तपासातून उलगडा होणार आहे.

### जीएसटीच्या रकमेचा अपहार केल्याचा आरोप!

'न्यू अशोक मोटर पार्ट्स' व्यवसायाशी संबंधित जीएसटी व्यवहारांची जबाबदारी आरोपीकडे होती. मात्र, दोन फर्मशी संबंधित जीएसटीची रक्कम शासनाकडे जमा न करता ३४ लाख ९६ हजार ९५६ रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याप्रकरणी संत तुकारामनगर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# पुणे शिक्षक-पदवीधर निवडणुकीत महायुतीला विजयाचा विश्वास!

## २५ हजार कार्यकर्ते सहा महिन्यांपासून प्रचारात सक्रिय असल्याचा राजेश पांडे यांचा दावा!

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे विभागातील शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीत संघटनात्मक ताकदीच्या जोरावर महायुतीचे दोन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी व्यक्त केला. डॉ. स्मिताताई योगेश जाधव आणि कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारासाठी गेल्या सहा महिन्यांपासून २५ हजार कार्यकर्ते सक्रिय असल्याचा दावा त्यांनी केला. प्रत्येक कार्यकर्त्याने किमान दहा मतदारांशी संपर्क साधल्याने महायुतीने मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी व्यापक यंत्रणा उभी केल्याचेही त्यांनी सांगितले.**



पुणे विभाग शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत पांडे बोलत होते. या वेळी शिक्षक मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार कौस्तुभ गावडे उपस्थित होते.

पांडे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महायुती ही निवडणूक लढवत आहे. महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनीही मतदारसंघात प्रचारासाठी दौरे केले आहेत. गेल्या सहा महिन्यांपासून कार्यकर्त्यांनी मतदारांशी संपर्क साधण्यावर भर दिला आहे. या संपर्क मोहिमेमुळे मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होईल आणि त्याचा फायदा महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिक्षक मतदारसंघातील उमेदवार कौस्तुभ गावडे यांनी शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पदवीधरांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगितले. शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी आपण यापूर्वीही संघर्ष केला असून, आता हे प्रश्न विधानभवनात मांडण्याची संधी मतदारांनी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेला जाहीरनामा हा केवळ आश्वासनांचा दस्तऐवज नसून, तो वचननामा असल्याचे सांगत त्यातील आश्वासने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षकांच्या सेवाविषयक अडचणी, त्यांच्या न्याय्य मागण्या आणि शिक्षण क्षेत्रातील विविध समस्यांची आपल्याला प्रत्यक्ष अनुभवातून जाणीव असल्याचे गावडे यांनी नमूद केले. शिक्षण संस्थेच्या प्रशासनात काम केल्यामुळे शिक्षकांसमोरील अडचणी आणि त्यांच्या प्रश्नांचे स्वरूप जवळून समजले आहे. त्यामुळे शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे काम करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये शिक्षक, प्राध्यापक आणि पदवीधरांच्या प्रश्नांसाठी काम केले आहे. या अनुभवाच्या बळावर मतदारांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न करीत असून, निवडून आल्यानंतर शिक्षकांच्या सेवाविषयक अडचणी, प्रलंबित मागण्या आणि शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे गावडे यांनी सांगितले.

### २५ हजार कार्यकर्त्यांची प्रचारयंत्रणा!

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी गेल्या सहा महिन्यांपासून २५ हजार कार्यकर्ते सक्रिय असल्याचा दावा भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी केला. प्रत्येक कार्यकर्त्याने किमान दहा मतदारांशी संपर्क साधल्याचे सांगत, या संघटनात्मक ताकदीच्या जोरावर शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांत महायुतीला विजय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पुण्यात ओटीपी टँकर व्यवस्थापन प्रणाली रखडली!

**पुणे | प्रतिनिधी**

**पाणी टँकरच्या बोगस फेऱ्या, पाणीचोरी आणि नागरिकांची आर्थिक लूट रोखण्यासाठी पुणे महापालिकेने जाहीर केलेली ओटीपी आधारित टँकर व्यवस्थापन प्रणाली सहा महिन्यांनंतरही प्रत्यक्षात सुरू झालेली नाही. या महत्त्वाकांक्षी योजनेची घोषणा करूनही अंमलबजावणी रखडल्याने पाणीटंचाईच्या काळात टँकरवर अवलंबून असलेल्या नागरिकांना पारदर्शक सेवा मिळण्याची प्रतीक्षा कायम आहे. आता आचारसंहिता संपल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.**



शहरातील टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा पारदर्शक करणे, प्रत्यक्ष पाणीपुरवठा न करताच बोगस फेऱ्या दाखविण्याचे प्रकार रोखणे आणि नागरिकांकडून अवाजवी पैसे आकारले जाण्याला आळा घालणे, हा या प्रणालीचा मुख्य उद्देश आहे. मात्र, घोषणा होऊन सहा महिने उलटले तरी ही यंत्रणा बहुतांश भागांत कार्यान्वित झालेली नाही. सूस आणि म्हाळुंगे परिसर वगळता शहरातील अन्य भागांत ही प्रणाली सुरू नसल्याचा दावा सजग नागरिक मंचाने केला आहे. त्यामुळे महापालिकेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी या विलंबाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. नागरिकांना पारदर्शक पद्धतीने टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही प्रणाली महत्त्वाची असताना तिची अंमलबजावणी अद्याप का झाली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पाणीपुरवठ्यासारख्या अत्यावश्यक सेवेत गैरप्रकार रोखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याची घोषणा करण्यात आली; मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी विलंब होत असल्याने नागरिकांना त्याचा लाभ मिळत नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

प्रस्तावित प्रणालीमध्ये नागरिकांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून पाण्याचा टँकर बुक करता येणार आहे. टँकर भरणा केंद्रातून निघाल्यापासून तो संबंधित नागरिकाच्या मागणीनुसार ठरलेल्या ठिकाणी पोहोचेपर्यंतच्या प्रवासाची डिजिटल नोंद ठेवली जाणार आहे. टँकरमधून पाणी मिळाल्यानंतर नागरिकाच्या मोबाईलवर आलेल्या ओटीपीद्वारे वितरणाची खातरजमा केली जाईल. त्यामुळे टँकर प्रत्यक्षात पोहोचला आहे की नाही आणि पाणी वितरित झाले आहे की नाही, याची नोंद ठेवणे शक्य होणार आहे.

या यंत्रणेमुळे प्रत्यक्ष पाणीपुरवठा न करता बोगस फेऱ्या दाखविणे, टँकरच्या फेऱ्यांमध्ये गैरव्यवहार करणे आणि पाण्याच्या वितरणातील अनियमितता यांसारख्या प्रकारांना आळा बसण्याची अपेक्षा आहे. तसेच टँकर बुकिंगपासून पाणी मिळेपर्यंतची प्रक्रिया डिजिटल झाल्यामुळे नागरिकांना सेवा अधिक पारदर्शक पद्धतीने मिळू शकेल.

दरम्यान, आगामी काळात पाणीकपात लागू झाल्यास किंवा पाण्याची मागणी वाढल्यास टँकरवरील अवलंबित्व आणखी वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत टँकरच्या फेऱ्या आणि पाणीवितरणावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा कार्यान्वित नसल्यास नागरिकांना पाण्यासाठी अधिक पैसे मोजावे लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे महापालिकेने ही प्रणाली केवळ कागदावर न ठेवता संपूर्ण शहरात तातडीने सुरू करावी, अशी मागणी वेलणकर यांनी केली आहे.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनीही ही प्रणाली अद्याप लागू झाली नसल्याचे मान्य केले. आचारसंहिता संपल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून प्रणाली तातडीने सुरू केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. ओला आणि उबर या सेवांच्या धर्तीवर काम करणाऱ्या या यंत्रणेमुळे टँकरचे बुकिंग, त्याचे वितरण आणि नागरिकांना पाणी मिळाल्याची नोंद डिजिटल पद्धतीने ठेवता येईल.